# *मराठवाडयातील षेतकरी आत्महत्येची समस्या –कारणे आणि उपाय*

डॉ. चंद्रषेखर इं गित्ते,
सहाय्यक प्राध्यापक, (लोकप्रषासन विभाग)
न्यु कोहिनूर महाविद्यालय, खुलताबाद जि. औरंगाबाद

**प्रस्तावना :–**भारत हा प्राचीन काळापासुन कृषी प्रधान देष राहिला आहे. देषातील 70 टक्के जनता आजही षेतीव्यवसायावर अवलंबुन असुन मानवाच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभुत गरजांबरोबर अनेक उद्योग व्यवसायांना लागणा–या कच्च्या मालाचा पुरवठाही षेती उत्पादनातुन केला जातो. त्यामुळेच देषाच्या सामाजिक – आर्थिक विकासात षेती व्यवसायाचे मोलाचे योगदान आहे. पुर्वी आपल्याकडे 'उत्तमषेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' अषी म्हण रूढ होती. यावरून आपणास षेती व्यवसायाचे महत्व लक्षात येते. परंतु सद्यस्थितीत मात्र अषी परिस्थिती राहिली नसुन षेतीव्यवसाय आजच्या काळात अत्यंत नाजुक व संकटग्रस्त अवस्थेतुन जात आहे. षेती कसणारा षेतकरीच षेतीव्यवसाय बुडीत निघाल्याने आत्महत्या करू लागला आहे. प्राचीन काळापासुन षेतीव्यवसायावर अनेकदा नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ अषी भयावह स्थिती निर्माण झालेली ऐकण्यात होती, ब्रिटीष राजवटीतही षेतक–यांचे अपरिमित षोषण झाले तरीही षेतक–यांच्या आत्महत्येची नोंद कधीही दिसुन आली नाही.उलट स्वातंत्र्यानंतर विषेषतः 1991 च्या नवीन आर्थीक धोरणाच्या (खाजगीकरण, उदारिकरण व जागतिकीकरण) स्विकारनंतर मात्र देषात षेतक–यांची आत्महत्या ही एक गंभीर समस्या उद्‌भवली आहे.[1] या समस्येवर तोडगा काढण्यासाठी षेतक–यांच्या आत्महत्येची कारणे षोधुन त्यावर उपाय करणे गरजेचे आहे.

**षेतकरी संकल्पनेचा अर्थ :–**'षेतकरी' हा षब्द व्यवसायवाचक असुन ढोबळमानाने त्याची व्याख्या 'षेती करणारा व्यक्ती तो षेतकरी' अषी केली जाते. परंतु या संकल्पनेची निष्चित मांडणी महाराष्ट्रातील षेतकरी संघटनेने केली आहे. षेतकरी संघटनेच्या मते, ''जो षेतीवर उपजीविका करतो तो षेतकरी'' त्यामुळे षेतकरी या संकल्पनेत षेतमालक, षेतमजुर, कारागिर, स्त्रिया इत्यादींचा समावेष होतो. ज्यांच्याकडे षेती नाही, परंतु जो षेतीवर उदरनिर्वाह करतो तो षेतकरी वर्गात समाविष्ट होतो''.[2] अषा प्रकारची व्याख्या फार व्यापक स्वरूपाची आहे. आन्द्रे बेतेय यांच्या मते, ''ग्रामीण भागातील एक खेडुत कुटुंब जे ख–या अर्थाने षेतकरी कुटुंब या श्रेणीमध्ये येऊ षकते, त्या कुटुंबातील सर्व सदस्य, स्त्री, पुरूष षेतात काम करतात'' तर भारताचे माजी प्रंतप्रधान चरणसिंग यांच्या मते, ''स्वतःच्या मालकीची जमीन (मग ती जमीनधारणा कितीही असो) आहे तो षेतकरी.''[3] अषा मर्यादित स्वरूपाची व्याख्या केली आहे.

**आत्महत्या संकल्पनेचा अर्थ :–**''आत्महत्या म्हणजे जाणीवपुर्वक स्वतःच्या षरीराचा नाष करणे होय'' किंवा सकारात्मक वा नकारात्मक कृतीचा षेवट आत्मनाषच होतो, अषी व्यक्तीकडुन घडणारी कोणतीही क्रिया म्हणजे आत्महत्या होय'' [4] डरखाईम च्या मते, ''आत्महत्या अषी घटना आहे, ज्यामध्ये व्यक्ती सकारात्मक अथवा नकारात्मक स्वरूपात असे कार्य करतो, ज्यामुळे त्याचे षरीर नष्ट होते''.[5] त्याहीपुढे जाऊन तो म्हणतो की, ''आत्महत्या ही वैयक्तिक कृती नाही तर सामाजिक कृती आहे. व्यक्तीच्या जगण्याची व मरण्याची इच्छा तिच्या सामाजिक वातावरणाकडे पाहण्याच्या प्रवृत्तीतुन होते.''[6]

**षेतक–यांची आत्महत्या : एक सामजिक घटना** :–फ्रेंच विचारवंत एमील डरखाईम यांनी 1897 साली "*The Suicide*'' नावाचा ग्रंथ लिहुन त्यात आत्महत्या विषयक सिद्‌धांत मांडला. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ''आत्महत्येचा दर व्यक्तिगत नसुन सामाजिक तथ्य आहे, म्हणजेच व्यक्ती स्वतःसाठी आत्महत्या करत

नाही तर तो समाजासाठी आत्महत्या करतो.[7] आत्महत्या ही एक सामाजिक घटना मानुन तिला समाजषास्त्रीय अभ्यास करण्याचे श्रेय डरखाईम यांच्याकडेच जाते. षेतक–यांच्या आत्महत्येचा अभ्यास करण्यासाठी डरखाईमने मांडलेच्या आत्महत्येच्या सिध्दांताचा आधार घेतला तर षेतक–यांच्या आत्महत्यांना कारणीभुत असणा–या घटना या वैयक्तिक स्वरूपाच्या नसुन त्या सामाजिक स्वरूपाच्या घटना आहेत. कारण षेतकरी हा आत्महत्येला स्वहितासाठी नव्हे तर सामाजिक प्रतिष्ठेला गेलेला तडा आणि समाजातील किया–प्रतिकिया यांच्यापासुन मुक्ती मिळण्यासाठी आत्महत्येस बळी पडतो.

**संशोधनाची उदिद्ष्टे**:–मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त षेतक–यांच्या कुटुंबीयांकडुन षेतक–यांच्या आत्महत्येला नेमकी कोणती कारणे जबाबदार आहेत यांचा षोध घेणे आणि षेतक–यांच्या आत्महत्यांच्या समस्येवर ठोस उपाय योजना सुचविणे.

**संषोधन पद्धती** :–षेतकरी आत्महत्यांच्या कारणांची तपासणी करण्याकरिता प्राथमिक आणि दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.संपुर्ण मराठवाडा विभागाला समग्र तर विभागातील सर्व आठ जिल्हयांना उपसमग्रात विभाजन करून समान प्रतिनिधीत्वाद्वारे प्रत्येकी तीन तालुक्यांची निवड करण्यात आली. प्रत्येक तालुक्यातुन ज्या गावातील षेतक–याकने आत्महत्या केली आहे. त्या षेतक–याच्या कुटुंबातील कोणत्याही एका नातेवाईकाची (पत्नी, आई, बहीण, भाऊ, मुलगा, वडील ) उत्तरदाता म्हणुन 'सहेतुक नमुना निवड पद्ध्तीने' (*purposive sampling Method*) निवड केली आहे. अषा रीतीने समग्रामधुन एकुण 200 उत्तरदात्यांची नमुना म्हणुन निवड करून मुलाखत–अनुसुची हे साधन वापरून तथ्य मिळवण्यात आले आहेत. तर दुय्यम सामग्रीसाठी मुळ संदर्भग्रंथ, षासकीय अहवाल, षोधप्रबंध, इंटरनेटचा वापर केला गेला आहे. त्या आधारे षेतक–यांच्या मुलभुत कारणांचे अध्ययन करून उपाययोजना सुचवल्या आहे.

**भारतातील षेतकरी आत्महयांची स्थिती** :–'भारतीय षेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जात मरतो' असे विधान रॉयल कमीषनने षेतक–यांच्या आर्थीक स्थितीचे विष्लेषण करतांना केले होते. अर्थात भारतीय षेतकरी वंषपरंपरागत कर्जबाजारी असतो. त्याचे वंषपरंपरागत कर्जाचे स्वरूप सातत्याने चालु राहते.[8] केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. षरद पवार यांनी 30 नोव्हेंबर 2007 रोजी राज्यसभेत असे सांगितले की, 1997 ते 2007 या दहा वर्षात देषभरात जवळपास दीड लाख षेतक–यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी 90,000 आत्महत्या (60 टक्के) महाराष्ट्र, आंधप्रदेष, कर्नाटक व मध्यप्रदेष (छत्तीसगड) या चार राज्यात झालेल्या आहेत.

'National Crime Record Bureao' च्या नोंदीनुसार भारतातील षेतकरी आत्महत्यांची उघडकीस आलेल्या प्रकरणांची संख्या ही 1997 ते 2008 या कालावधीत 199132 इतकी प्रचंड होती. त्यामध्ये आंध्रप्रदेष राज्यात 1997 साली 1097, 1998 साली 1813, 1999 साली 1974, 2000 साली 1525, 2001 साली 1509, 2002 साली 1896, 2003 साली 1800, 2004 साली 2666, 2005 साली 2490, 2006 साली 2607, 2007 साली 1797, 2008 साली 2105 अषा 1997 ते 2008 या कालावधीत एकुण 23279 षेतकरी आत्महत्या झाल्या. कर्नाटक राज्यात 1997 साली 1832, 1998 साली 1883, 1999 साली 2379, 2000 साली 2630, 2001 साली 2505, 2002 साली 2340, 2003 साली 2678, 2004 साली 1963, 2005 साली 1883, 2006 साली 1720, 2007 साली 2135, 2008 साली 1737 अषा 1997 ते 2008 या कालावधीत एकुण 25685 षेतक–यांच्या आत्महत्या झाल्या.

मध्यप्रदेष आणि छत्तीसगड राज्यात 1997 साली 2390, 1998 साली 2278, 1999 साली 2654, 2000 साली 2660, 2001 साली 2824, 2002 साली 2578, 2003 साली 2511, 2004 साली 3033, 2005 साली 2660, 2006 साली 2858, 2007 साली 2856, 2008 साली 3152 अषा 1997 ते 2008 या कालावधीत एकुण 32454 षेतकरी आत्महत्या झाल्या. तर पुरोगामी व विकासाच्या सर्व क्षेत्रात प्रगत असणा–या महाराष्ट्र राज्यात षेतक–यांच्या आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक असुन 1997 साली 1917, 1998 साली 2409, 1999 साली 2423, 2000 साली 3022,2001 साली 3536, 2002 साली 3695, 2003 साली 3836, 2004 साली 4147, 2005 साली 3926, 2006 साली 4453, 2007 साली, 4238 तर 2008 साली 3802 अषा 1997 ते 2008 या कालावधीतील एकुण 41404 (देषातील षेतक–यांच्या एकुण आत्महत्यापैकी 23.1 टक्के) षेतक–यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. तर उर्वरित भारतात 1997 साली 6386, 1998 साली 7632, 1999 साली 9430, 2000 साली 6766, 2001 साली 6041, 2002 साली 7462, 2003 साली 6339, 2004 साली 6432, 2005 साली 6172, 2006 साली 5422, 2007 साली 5606 आणि 2008 साली 5349 अषा 1997 ते 2008 या कालावधीत एकुण 179087 षेतकरी आत्महत्या झाल्या.[10]

**<u>मराठवाडयातील षेतकरी आत्महत्या</u>** :–षेतकरी आत्महत्यांची प्रकरणे देषात सर्वाधिक प्रमाणात महाराष्ट्र राज्यात (41404 (23.1 टक्के) आणि त्यातही विदर्भ विभागात व त्याखालोखाल मराठवाडा विभागात घडलेली आहेत. मराठवाडयात 2001 ते 2008 या कालावधीत एकुण 1102 षेतक–यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.[11] त्यांची जिल्हा निहाय संख्या खालील तक्त्याहुन समजुन येते.

**तक्ता कमांक 01**

**मराठवाडयातील षेतकरी आत्महत्यांचे जिल्हानिहाय प्रमाण 2001 ते 2008**

| अ.क. | जिल्हानिहाय विभागणी | षेतकरी आत्महत्यांचे प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी |
| 1 | औरंगाबाद | 79 | 07.16 |
| 2 | जालना | 111 | 10.07 |
| 3 | परभणी | 111 | 10.07 |
| 4 | हिंगोली | 62 | 05.62 |
| 5 | नांदेड | 223 | 20.23 |
| 6 | बीड | 317 | 28.76 |
| 7 | लातुर | 67 | 06.10 |
| 8 | उस्मानाबाद | 132 | 11.97 |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकुण | 1102 | 100 |

**संदर्भ :– विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.**

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते की, 2001 ते 2008 या कालावधीत मराठवाडयातील एकुण 1102 षेतकरी आत्महत्येपैकी 28.76 टक्के (317) षेतकरी आत्महत्या या बीड जिल्हयात झाल्या असुन त्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे तर मराठवाडयात सर्वात कमी षेतकरी आत्महत्या या हिंगोली जिल्हयात झालेल्या दिसुन येतात. त्यांचे प्रमाण 5.62 टक्के (62) इतके आहे. जालना आणि परभणी जिल्हयात षेतकरी आत्महत्येचे प्रमाण सारखे असुन अनुक्रमे 10.07 टक्के (111) व 10.07 टक्के (111) असे आहे. बीड नंतर सर्वाधिक षेतकरी आत्महत्या 20.23 टक्के (223) नांदेड जिल्हयात झालेल्या दिसुन येतात. उस्मानाबाद, औरंगाबाद व लातुर जिल्हयातील षेतकरी आत्महत्येचे प्रमाण हे अनुक्रमे 10.97 टक्के (132), 7.16 टक्के(79) व 6.10 टक्के (67) असे आहे.

थोडक्यात, मराठवाडयात कृषीची स्थितीही समाधानकारक नाही, मराठवाडयातील बहुसंख्य षेतकरी निरक्षर, अज्ञानी व परंपरागत षेती करणारे आहेत. त्यामुळे मराठवाडयातील षेती अप्रगत राहिली व परिणामी मराठवाडयात षेतकरी आत्महत्यांचा प्रारंभ झाला.[12] त्यात बीड, नांदेड, उस्मानाबाद, जालना व परभणी या जिल्हयांचे प्रमाण सर्वाधिक असतांना दिसते.

**<u>मराठवाडयातील षेतकरी आत्महत्येची कारणे</u>** :–षेतकरी आत्महत्येची कारणे षोधण्यासाठी संषोधकाने मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त षेतक–यांच्या 200 कुटुंबीयांकडुन (उत्तरदात्यांकडुन) माहिती करून घेतली असता, षेतकरी आत्महत्येला विविध कारणे जबाबदार आहेत असे आढळुन आले, त्यात मुख्यतः सिंचनाचा अभाव, विजेचे भारनियमन, खते व बि–बियाणांची बेभाव विक्री, निसर्गाचा लहरीपणा, मालाला हमी भावाचा अभाव, कृषी योजनांच्या अंमलबजावणीतील उदासीनता, कृषीपुरक व्यवसायांची कमतरता, प्रषिक्षणाचा अभाव, अनुदान व कर्ज मिळवण्यातील क्लिष्ट प्रक्रिया, खाजगी सावकरांची मनमानी, खर्चीक लग्न–सण–समारंभ तसेच षेतीच्या वार्षीक नियोजनाचा अभाव अषा विविध कारणांचा समावेष आढळुन आला. षेतीला पाणी नसल्यामुळे बागायती किंवा एकापेक्षा अनेक पिके षेतक–यांना घेता येत नाहीत. परिणामी कोरडवाहु जमीनीवर उपजीविका भागवावी लागते. त्यामुळे सिंचनाचा अभाव षेतकरी आत्महत्येस जबाबदार आहे, असे 76.50 टक्के (153) उत्तरदात्यांचे मत आहे. काही षेतक–यांना सिजनेबल पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असतो, परंतु मराठवाडयातील ग्रामीण भागात सोळा ते अठरा तासापर्यंत विजेचे भारनियमन करण्यात येते, त्यामुळे उत्पादनात घट झाल्याने षेतकरी आत्महत्या करतात. असे 80 टक्के (160) उत्तरदात्यांचे मत आहे. बि–बियाणे एजन्सीधारकांकडुन ऐन पेरणीवेळीच खते व बियाणांची बेभावात विक्री करण्यात येते. त्यामुळे वर्षाच्या प्रारंभीच षेतक–यांची अर्थव्यवस्था डळमळीत झाल्याने त्याचा वर्षभर ताळमेळ लागत नाही. ब–याच वेळा एजन्सीधारकांकडुन उदारीवर खते बि–बियाणे घ्यावी लागतात. त्या रकमेला त्यांच्याकडुन प्रती षेकडा 10 रूपयांपर्यंत व्याज आकारले जाते. या व्याजाचा पैसा परतफेड होत नाही, त्यामुळे षेतकरी आत्महत्येचा मार्ग अवलंबतात असे 53.50 टक्के (107) उत्तरदात्यांचे मत आहे. भारतीय षेती पारंपारिक पद्धतीवर अवलंबुन असल्याने मराठवाडयातील षेतक–यांनाही तांत्रीकतेच्या

अभावी तसेच हवामानाचा व निसर्गाचा लहरीपणा षेती उत्पादनात घट आणतो. त्यामुळे षेती परवडत नसल्याने षेतकरी आत्महत्या करतात असे 74.50 टक्के (149) उत्तरदात्यांचे मत आहे. निसर्गाच्या या स्थितीतुनही षेतक—यांनी जो माल पिकवला त्या मालालाही व्यापारी व षासनाकडुन खर्चाच्या प्रमाणात योग्य तो हमी भाव मिळत नाही त्यामुळे षेतीव्यवसाय बुडीत निघाल्याने षेतक—यांनी आत्महत्या केल्या असे 87.50 टक्के (175) उत्तरदात्यांचे मत आहे.

षासनाच्या अनेक योजना षेतक—यांच्या विकासासाठी असतानाही त्या योजनांची अंमलबजावणी प्रषासकीय अधिकारी कर्मचा—यांकडुन न झाल्याने त्यांचा लाभ षेतक—यांना घेता येत नाही. त्यामुळे उत्पन्नात वृद्धी करणे अषक्य होते. परिणामी षेतकरी आत्महत्येस  बळी पडतात, असे 71.50 टक्के (143) उत्तरदात्यांचे मत आहे. आत्महत्याग्रस्त षेतक—यांना कृषीपुरक व्यवसाय निर्मितीसाठी अनुदान, कर्ज, प्रषिक्षण तसेच तांत्रीक मदत मिळवुन देण्यात प्रषासनाची उदासिनता दिसुन आली. तसेच ज्या षेतक—यांनी असे लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न केला त्यांना अनेक वेळा क्लिष्ट व गुंतागुंतीच्या कागदी प्रक्रियेत अडकविण्यात आले. त्यामुळे षेतक—यांचे सर्व मार्ग बंद झाल्याने त्यांना आत्महत्या करणे सोपे वाटले असे 64.50 टक्के (129) उत्तरदात्यांचे मत आहे. आत्महत्याग्रस्त षेतक—यांना आर्थीक उपलब्धीचा कोणताही मार्ग नव्हता. त्यावेळेस त्यांनी खाजगी सावकाराकडुन पैसा घेऊन आपला उदरनिर्वाह चालवला. परंतु खाजगी सावकरांनी आपल्या मनमानी पद्धतीने 5ते 10 रूपये प्रती षेकडयाने रक्कम वसुल करण्याचा प्रयत्न केला.ती रक्कम कधीही परतफेड झाली नाही, परिणामी कर्जबाजारीपणास सामोरे जावे लागल्याने व गावातील सामाजिक प्रतिष्ठेस तडा गेल्याने वैफल्यग्रस्त स्थितीत जाऊन षेतक—यांनी आत्महत्या केली असे 80.50 टक्के (161) उत्तरदात्यांचे मत आहे. ब—याच वेळा षेतकरी गावात आपला बडेजावपणा किंवा मोठेपणा दाखवण्यासाठी लग्न, लग्नातील हुंडा, सण—समारंभात सावकाराकडुन पैसे घेऊन मोठया प्रमाणात खर्च करतात. पुढे तो खर्च कोरडवाहु षेतीच्या अल्प उत्पन्नावर भरून काढता न आल्याने व सावकाराने पैष्याचा तगादा लावल्याने षेतकरी आत्महत्येचा मार्ग धरतात असे 70.50 टक्के (141) उत्तरदात्यांचे मत आहे. या कारणांबरोबरच षेतीच्या वार्षीक नियोजनाचा अभाव, सहकारी व स्वयंसेवी संस्थांचा अभाव, बचत गटांचा अभाव, गावातील गटबाजीचे राजकारण अषी काही वैयक्तिक आणि सामाजिक कारणे षेतक—यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत. त्यावर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष** :—1)महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात विदर्भाप्रमाणेच मोठया प्रमाणात सिंचन क्षेत्राचा अभाव असल्याकारणाने षेतक—यांना बागायतीमुळे पिके घेता येत नाहीत. त्यामुळे जिरायती कोरडवाहु षेतीतील अल्प उत्पादनावर कुटुंबाचा प्रपंच भागवणे कठीण जाते. त्यामुळे षेतकरी वैफल्यग्रस्त अवस्थेत जाऊन आात्महत्या करतात.

2)ज्या काही षेतक—यांकडे षेतीला पाणी देण्याचा स्त्रोत उपलब्ध आहे. परंतु मराठवाडयातील ग्रामीण भागात सोळा ते अठरा तास विजेचे भारनियमन षासनाकडुन करण्यात येत असल्याने हाती आलेले पिक वाया जाते. तो धक्का सहन न झाल्याने षेतकरी नैराष्यातून आत्महत्येचा मार्ग स्विकरतो.

3)खते, संकरीत बी—बियाणे विकणा—या एजन्सीधारकांवर षासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याकारणाने ते षेतक—यांना खते व बि—बियाणांचा पुरवठा बेभावात करतात. त्याचवेळी षेतक—याची अर्थव्यवस्था डळमळीत होते. त्याचा वर्षभर ताळमेळ बसत नाही.

4)निसर्गाचा व हवामानाचा लहरीपणा षेती उत्पन्नात घट आणतो. जे काही षेतीतुन उत्पन्न निघाले आहे. त्यालाही योग्य तो हमी भाव मिळत नाही. या उत्पन्नातुनच घर चालवणे, मुलींचे विवाह करणे,

सण–समारंभ पार पाडणे अवघड जाते. त्यामुळे षेतक–यांना खाजगी सावकरांकडुन 10 रूपये प्रती षेकडा इतक्या व्याजाने कर्ज घ्यावे लागते. परंतु ते कर्ज षेतीच्या उत्पन्नातुन परतफेड करता येत नाही. त्यामुळे गावात व समाजात स्वतःची प्रतिष्ठा मलीन होत आहे. या विचारातुनच षेतकरी आत्महत्येला बळी पडतात.

5)षेतक–यांसाठी असणा–या षासकीय योजना षेतक–यांपर्यंत न जाता त्या फक्त कागदपत्रावरच राहतात. निरक्षर व अल्पसाक्षर षेतक–यांना कागदी प्रक्रियेत अडकवुन प्रषासकिय यंत्रणा बेफीकीरपणे या योजनांचे लाभ षेतक–यांना मिळवुन देण्यासाठी उदासीन दिसते.

6)मराठवाडयातील षेतकरी अजुनही पारंपारिक पद्धतीवर आधारीत षेती करत आहेत. तसेच त्यांना षेती आधारीत किंवा कृषीपुरक उद्योग व्यवसाय उभारता आले नाहीत. त्यामुळे षेती उत्पन्नाला दुस–या कोणत्याही उत्पन्नाची जोड न मिळाल्याने षेतीच्या अल्प उत्पन्नावर उपजिविका भागविली जात नाही. परिणामी षेतक–यांना आत्महत्येचीच वाट धरणे भाग पडते.

7)मराठवाडयातील ग्रामीण भागात सहकारी संस्थांचे, सहकारी बॅकांचे, स्वंयसेवी संस्थांचे, बचत गटांचे प्रमाण हे खुपच अल्प असल्याकारणाने तसेच षेतीच्या नियोजनाअभावी व षेती विकासाच्या योजनांचा लाभ घेतांना आडवे येणारे मतभेदाचे राजकारण यामुळे षेतीव्यवसाय मागास व दुर्लक्षीत झाला आहे. त्याचे रूपांतर षेतकरी आत्महत्येत होत आहे.

**उपाययोजना** :–1)केंद्र व राज्यषासनाने सर्व षेतक–यांना 2008 मध्ये कर्ज माफी दिलेली असली तरीही ही कर्जमाफी हा षेतक–यांच्या आत्महत्येवरील एकमेव उपाय नसुन त्यांना देण्यात आलेला तात्पुरता आधार आहे. कारण मराठवाडयाचा सिंचनाचा अनुषेष पुर्णतः भरून काढल्याषिवाय तसेच मराठवाडयातील ग्रामीण भागाचे विजेचे भारनियमन पुर्णतः बंद केल्याषिवाय षेतक–यांच्या आत्महत्येची समस्या सोडवता येणार नाही. अर्थात, मराठवाडयातील षेतक–यांच्या षेतीला बारमाही चोवीस तास पाणी आणि विज पुरवठा करण्यात आला पाहिजे. ज्यामुळे षेती उत्पन्न वाढवुन षेतक–यांच्या आत्महत्येवर मात करता येईल.

2)षेतक–यांना आपल्या षेतीसाठी वर्षभर नेमके किती बि–बियाणे व खते लागणार आहेत याची नोंद सरळ संगणकावरील इंटरनेटद्वारे षासनाच्या कृषी विभागाकडे करावी. ज्यामुळे पेरणीपुर्वीच षासनाला खते व बि–बियाणांचा पुरवठा करता येईल. तसेच कोणत्या राज्यामध्ये, जिल्हयामध्ये, तालुक्यामध्ये व गावामध्ये किती खते व बि–बियाणे लागेल याची माहिती मिळेल. अषा संगणक व इटरनेटची प्रक्रिया प्रत्येक गावामध्ये केली जावी.षेतक–यांनी खते व बियाणे एजन्सीधारकाकडुनच घ्यावेत. परंतु त्याची रक्कम मात्र त्यांना न देता षासनाच्या नावे राष्ट्रीयकृत बॅकेत भरावी किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवावीत एजन्सीधारकांना षासनाकडुन काही टक्के रक्क्म कमीषन स्वरूपात देण्यात यावी. ज्यामुळे खते व बियाणे विक्रीत भ्रष्टाचार होणार नाही व एजन्सीधारक बेरोजगार होणार नाहीत.

3)राज्यातील सर्व जिल्हा व तालुकास्तरावर हवामान खात्याची यंत्रणा राबवावी जेणेकरून षेतक–यांना आपल्या स्थानिक ठिकाणच्या निसर्गाचा अंदाज घेऊन पीक पद्धतीत बदल करता येईल.

4)षेतक–यांनी हुंडा पद्ध्तीला पुर्णतः विरोध करून लग्न सण–समारंभ साध्या पद्धतीने व कमी खर्चात पार पाडावेत. जो कोणी हुंडा देईल किंवा घेईल त्यावर एक वर्षाची कारावासाची षिक्षा ठोठवावी.

5)प्रशासकिय यंत्रणेने षेतक–यासाठी असणा–या विविध योजना षेतक–यांपर्यत पोहोचवुन षेतीला कृषीवर आधारीत किंवा कृषी पुरक व्यवसायांची जोड देऊन त्यांच्या उत्पन्नात भर घालावी. त्यासाठी प्रषिक्षण वर्ग, उद्बोधन वर्ग व मार्गदर्षन वर्ग ठेवावेत.

6)संपुर्ण मराठवाडयात सहकारी संस्थांचे, सहकारी बॅकांचे, स्वयंसेवी संस्थांचे, बचत गटांचे जाळे निर्माण करावेत. त्याला सहमतीच्या राजकारणाची जोड देण्यात यावी.

**समारोप** :—मराठवाडयातील षेतकरी आत्महत्या ही एक गंभीर समस्या असुन त्यांच्या आत्महत्येची वैयक्तिक तसेच सामाजिक अषी विविध कारणे आहेत. परंतु यावर वरील सुचविलेल्या उपाययोजनांचा वेळीच योग्य त्या ठिकाणी वापर केला तर मराठवाडयातील षेतकरी आत्महत्यांची समस्या सोडवता येईल.

## संदर्भ


1)देषमुख रूपेष :महाराष्ट्रातील षेतक—यांच्या आत्महत्या व प्रषासनाची भुमिका —विषेष संदर्भ बीड जिल्हा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केलेला पीएच.डी.चा अप्रकाषीत षोधप्रबंध ऑगस्ट, 2010 पा. 128-129

2)खांदवे एकनाथ : षेतकरी दबाव गट ते राजकिय पक्ष—एक चिकित्सक अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केलेला पीएच.डी. चा अप्रकाषीत षोधप्रबंध, 2005.

3)देशमुख रूपेष : पुर्वोवत , पा. 120

4)मनवर डी. एस. : समाजषास्त्रीय विचारांचे मुळ आधार, अरूण प्रकाषन, लातुर, 2004, पा. 128

5)कित्ता : पा. 129

6)कुलकर्णी पी. :सामाजिक विचारप्रवाह, मंगेष प्रकाषन, नागपुर, 1998, पा. 112

7)कित्ता : पा. 112

8)Kurulkar R.P.: The Report on Farmer Suicides in Marathwada Region of Maharashtra State, Swami Ramanand Teerth Research Institute Aurangabad, Nov. 2006

9)साईनाथ पी : दैनिक हिंदु 12—15 नोव्हेंबर, 2007.

10)National Crime Record Bureao

11)Divisional commisnor offices, Aurangabad, Annual Report 2001-2008

12)Bhutekar Dattaray :Two day National Seminar on Planning for development of Maharashtra Region. Issues and concerns Research Paper (6 th & 7 th March 2009)